ऑटिझम पझल

.........

घरात नवीन सुद्रुढ बाळाचे आगमन म्हणजे आनंदाची पर्वणीच.  अशा या कौतुकाच्या बाळाला "डेव्हलपमेंटल डीसाबिलिटीस" असू शकतात असे कुणाला स्वप्नात सुद्धा वाटणार नाही.

ऑटिझमचे निदान म्हणजे बाळाच्या मातापित्यांवर मोठाच आघात आहे. पण असे हे योग्य निदान मातापित्याला वेगवेगळ्या उपचारांचे आणि सोईचे दालन खुले करुन देते. पण एक लक्षात घ्या की योग्य निदान अतिशय महत्वाचे आहे.

या क्षेत्रातील नामवंत तज्ञ आणि या विषयावरील पुस्तके या मुलांच्या वाढीची तसेच सुधारण्याची शक्यता नाकारतात.  आणि म्हणूनच योग्य सोईसुविधा, उत्तम उपचार आणि योग्य शिक्षण ऑटिस्टिक मुलांना लवकरात लवकर उपलब्ध होण्याची आवश्यकता आहे. जेवढ्या लवकर मुलांवर उपचार सुरू होतील तेवढेच त्यांचे उर्वरित आयुष्य उत्तम होण्याची आशा जोर धरते. त्यांची प्रगती इतर मुलांपेक्षा जरी मंद असली तरिसुद्धा एक सुखी आणि परीपूर्ण आयुष्य ही मुले नक्कीच जगू शकतात.

ऑटिझम म्हणजे काय?

ऑटिझम ही एक अशी "डेव्हलपमेंटल डिसाबिलिटी" आहे की जिचा परिणाम मुलांच्या सामाजिक व्यवहार, भाषा आणि सर्वसामान्य वागणुकीत दिसून येतो. या तिन्ही गोष्टीत सर्वसामान्य मुलांच्या तुलनेत ही मुले मागे पडतात. ऑटिझम हा एक "स्पेकट्रम डिसौर्डर" आहे. याचा अर्थ असा की ऑटिझम चा परिणाम मुलांवर वेगवेगळ्या तऱ्हेने जाणवतो. काही मुले उत्तम बोलतात तर काही अगदी थोडी किंवा जवळजवळ नाहीच.

पीडीडी म्हणजे "पर्वेसीव डेव्हलपमेंटल डीसओर्डेर" किंवा "अॅस्पर्जरचा सिंड्रोम" च्या काही मुलांमधे योग्य भाषा जरी आढळली तरी त्याच मुलांमध्ये सामाजिक आणि वागणुकीचे दोष आढळतात.

कारणे (अनुवंशिक आणि वातावरण)

१. आनुवंशिकता : वेगवेगळ्या संशोधनामधे बरेच दूमत आहे. जीन्स्चे प्रमाण अतिशय आहे. दहा ते बारा जीन्स्चे गुंतागुंतीकरण या मध्ये अभिप्रेत आहे.

२. वातावरण : वातावरणामुळे होणारे दोष हे अतिशय थोड्या वैज्ञानिक माहितीवर आधारित आहे.

३. हेवी मेटल्स : जड धातुंच्या वाढलेल्या पातळ्या, कमी ग्लूटोथायोन मुळे उत्सर्जन कमी प्रमाणात.

४. प्रतिजैवकांचा अतोनात मारा : पोटाचे आरोग्य धोक्यात आणि सकस अन्नाचे पोषण न झाल्यामुळे "नीऊरोडेव्हलपमेंटल" दोष.

५. प्रतिरोधक औषधे (वेक्सीन्स) त्यातही गालगुंड, गोवर, रुबेला यासाठी असलेले एम.एम.आर. हे औषध.

६. पिकांवरील कीटकनाशकांचा अतोनात मारा.

७. योग्य खनिजांचा अभाव (आयोडीन, लिथियम) ई.

८. काही अनाकलनीय घटक.

ऑटिझम बद्दलचे गैरसमज :

१. ऑटिस्टीक माणसे/मुले डोळ्याला डोळा भिडवीत नाहीत. ते तुमच्याकडे सरळ बघतच नाहीत.

२. ऑटिझम हा मानसिक आजार आहे.

३. ऑटिस्टीक माणसे/मुले बोलतच नाहीत.

४. ऑटिस्टीक माणसे/मुले शिकत नाहीत.

५. ऑटिस्टीक माणसे/मुले स्पर्शाला दाद देत नाहीत किंवा भावना दाखवत नाहीत.

६. त्यांना मित्र नको असतात.

अमेरिकेतील ऑटिझम

गेल्या वीस वर्षात ऑटिझमचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. २००४ मध्ये अमेरिकेतील रोगप्रतिबंधक संस्थेच्या अहवालानुसार १६६ मुलांमध्ये १ ऑटिस्टीक आढळतो. याहीपेक्षा गंभीर म्हणजे दर ६ अमेरिकन मुलांमधील एका मुलात नेव्रोडेव्हलपमेंटल किंवा वागणूकीतला दोष दिसून येतो.

पुढे काय?

उपचार करुन बरे करावे की काहीही न करता शांत रहावे?

योग्य उपचारविना फ़ारच थोडी ऑटिस्टीक मुले पूर्णपणे बरी होतात. पण म्हणून ती बरी होणार नाहीत असे अजिबात नाही. उपचाराविना मुलांची सामाजिक वागणूक सुधारणार नाही किंवा ते माणसात योग्य बोलू किंवा वागू शकणार नाहीत.

पण आनंदाची खबर अशी की बऱ्याच उपचारपद्धती उपलब्ध आहेत . काही उपचारांमुळे या मुलांमध्ये उत्तम सुधारणा होते तर काहींमध्ये बरेच कमी सुधारणेचे प्रमाण दिसते. प्रत्येक रुगणास वेगवेगळ्या उपचारपद्धतींचा अवलंब कराव लागतो.

ऑटिझमचे प्रमाण दर्शविणारे खालील आकडे:

१. : ४ मुलांमध्ये एक मुलगी

२. : १९९० नंतर प्रमाण वाढले

३. : २००७ मध्ये रोगप्रतिबंधक संस्थेच्या अहवाल १५० मध्ये १ ऑटिस्टीक

ऑटिझमचे दोन प्रकार:

लवकर निदान (अर्ली ओंसेट) : ऑटिस्टीक मुले जन्मापासुनच वेगळी.

उशीरा निदान (रिग्रेसीव) : वयाच्या १२ ते २४ महिन्यांत वाढीचा वेग मंदावणे.

....

अप्रील इझ ऑटिझम अवेरनेस मंथ ....

क्रमशः उर्वरित लेख पुढल्या अंकात ....

....

लेखिका : मनीषा लाड

मराठी रुपांतर : सुनीता चौधरी

....